खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

SPB
SHRI PISARNATH BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

वर्ष : ०५ | अंक : ३३१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१२ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## महाराष्ट्रात पुन्हा आक्राळविक्राळ पावसाची शक्यता, पंजाबराव डख

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** राज्यात सध्या पावसाने उसंत घेतली आहे. जुलैच्या पहिल्या आठवड्यात जोरदार पाऊस पडला. संपूर्ण जुलै महिन्यात सरासरी जितका पाऊस पडतो तितका पाऊस आठ दिवसांत पडला. यानंतर पावसाने ब्रेक घेतला आहे. आगामी काळात अल-निनोमुळे पावसाची शक्यता कमी आहे, अशी चर्चा होत आहे. पण हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी वेगळे अंदाज वर्तवले आहेत. राज्यात पुन्हा आक्राळविक्राळ पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे.

राज्यात ११ ते १४ जुलै सूर्यदर्शन होणार आहे. त्यानंतर १५ किंवा १६ जुलैपासून हळूहळू पावसाला सुरुवात होणार आहे. १६ ते १९ जुलैच्या दरम्यान राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडणार आहे. हा पाऊस विखुरलेल्या स्वरुपाचा असणार आहे. लातूर, नांदेड, धाराशिव, सोलापूर आणि बीड जिल्ह्यांतील काही



भागांमध्ये तुरळक ठिकाणी पावसाची हजेरी असणार आहे, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे.

**पाऊस पुन्हा धुमाकूळ घालणार!**

मुंबई, पुणे, नाशिकमध्ये हवामान कोरडं राहणार आहे. चांगल्या पावसासाठी जुलैच्या शेवटच्या आठवड्याची वाट पाहावी लागेल. त्यावेळी पाऊस पुन्हा धुमाकूळ घालणार आहे. दुष्काळ पडणार नाही, असं पंजाबराव डख यांन सांगितलं आहे.

**राज्यात १५ दिवस पावसाची शक्यता**

२१ जुलै ते ५ ऑगस्ट या काळात मुसळधार पावसाची शक्यता आहे. या काळात अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे, असा अंदाज पंजाबराव डख यांनी वर्तवला आहे. बंगालच्या खाडीत भुवनेश्वर आणि चेन्नईच्या दरमान चक्रीवादळ तयार होईल. त्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा पाऊस येईल, अशी माहिती पंजाबराव डख यांनी दिली आहे.

**हवामान विभागाचा अंदाज काय?**

राज्याच्या हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढचे दोन दिवस पावसाची शक्यता कमी आहे. असं असलं तरी १३ जुलैला चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया या तीन जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तसेच बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यांना १४ आणि १५ जुलै रोजी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर नागपूर जिल्ह्याला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

दरम्यान, राज्यात आगामी काळात पुरेसा पाऊस पडेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. यावर्षी संपूर्ण जुलै महिना पावसाने दांडी मारली. त्यामुळे अनेकांना पाऊस येणार की नाही? याबाबत भीती वाटत होती. अल-निनोच्या प्रभावामुळे पावसावर परिणाम होत आहे. असं असलं तरी राज्यात सरासरीच्या ९२ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी राज्यात चांगला पाऊस पडेल, असा अंदाज वर्तवला आहे.

## जीवघेणे पट्टे आणि गतिरोधक ; मोताळा तालुक्यातील अपघातांची शुंखला थांबेना

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, बुलढाणा :** बुलढाणा-मोताळा रोड वरील फार्म हाऊस सम ोरील प्रसिद्ध असलेला गतिरोधकही सद्यस्थितीत अपघातांच्या शुंखलेचे कारण ठरत आहे.

सदर गतिरोधक बांधल्यापासून आजपर्यंत कित्येक नागरिकांचे अपघात या ठिकाणी घडले आहे. तांत्रिक दोष असलेला हा तथाकथित गतिरोधक तांत्रिकदृष्ट्या योग्य रीतीने बांधण्यात यावा किंवा त्याऐवजी रबर गतिरोधक बसविण्यात यावे अशी मागणी जनम ानसातून होत आहे. आज सायंकाळी पाच च्या दरम्यान मेहकर तालुक्यातील आमखेड येथील रहिवाशी टू व्हीलर ने



जात असतांना गतिरोधक वरून गाडीचे बॅलन्स गेल्यामुळे अपघाताची दुर्दैवी घटना घडली. सुदैवाने प्राणहानी झाली नसली तरी मोठ्या प्रमाणात शारीरिक इजा सदर चालकाला झाली आहे. अपघात ग्रस्त नागरिक आणि टू व्हीलर रस्त्याच्या मधोमध पडलेली असतांना प्रत्येक जण बघायची भूमिका घेत होता. यावेळी सुदैवाने न्यायालयीन कामकाज करून बुलढाण्याकडे येत असताना आझाद हिंद शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड.सतीशचंद्र रोठे पाटील यांनी तत्काळ अपघातग्रस्त जखमीची परिस्थिती आणि वाहणारा वाहनांचा रोख पाहत अपघातग्रस्ताला रोडच्या बाजूला घेत ॲम्बुलन्स बोलवून उपचारासाठी रवाना केले. अपघातग्रस्ताची सद्यस्थितीत प्रकृती धोक्याच्या बाहेर आहे.

**मोताळा तालुक्याला अपघातांचे ग्रहण..!**

मोताळा तालुक्याला अपघातांचे ग्रहण लागले असून नुकतीच दोन दिवसांपूर्वी वाघजाळ फाटा ते धामणगाव बढे रोडवर असंख्य अपघात घडल्याची घटना समोर आली. नुकत्याच बांधलेल्या रोडच्या बाजूला टाकलेला पट्टा आणि रोड खालीवर झाल्यामुळे असंख्य अपघात दैनंदिन घडत असल्याची घटना नुकतीच आहे. यासह बोराखेडी, वडगाव सारोळा पीर,पिंपळगाव देवी या मार्गावर सुद्धा अपघाताची शृंखला दैनंदिन सुरू आहे.

मुरुड बांधकाम करताना राहिलेल्या तांत्रिक दोषामुळे नागरिकांना नाहक अपघाताला आणि मृत्यूला सामोरे जावे लागत आहे. याकडे संबंधित प्रशासनाने लक्ष द्यावे अशी मागणीही यावेळी आझाद हिंद शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड सतीशचंद्र रोठे पाटील यांनी केली आहे.

## पावसाळी अधिवेशन संस्थगित ! पुढील हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून नागपुरात

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, मुंबई :** महाराष्ट्र विधानसभेचे पावसाळी अधिवेशन राष्ट्रगीताने संस्थगित करण्यात आले. महाराष्ट्र विधानसभेचे पुढील अधिवेशन सोमवार, ७ डिसेंबर २०२६ रोजी नागपूर येथील विधानभवनात होणार असल्याची अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी घोषणा केली.

महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात एकूण १४ बैठका घेण्यात आल्या असून १२७ तास ५४ मिनिटांचे प्रत्यक्ष कामकाज झाले. रोजच्या कामकाजाची सरासरी ९ तास ९ मिनिटे इतकी राहिली, अशी माहिती विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर यांनी दिली.

अधिवेशनादरम्यान ९०९५ प्रश्न प्राप्त झाले. त्यापैकी ४१० प्रश्न स्वीकृत करण्यात आले आणि ५८ प्रश्नांना सभागृहात उत्तरे देण्यात आली. याशिवाय ५०० प्रश्नांची लेखी उत्तरे देण्यात आली.

अल्पकालीन चर्चेसाठी प्राप्त झालेल्या ६ सूचनांपैकी ५ मान्य करण्यात आल्या आणि ३ चर्चा पार पडल्या. लक्षवेधी सूचनांच्या २९९८ सूचनांपैकी २९२ स्वीकृत करण्यात आल्या, तर ६२ सूचनांवर सभागृहात चर्चा झाली. नियम २९३ अन्वये प्राप्त झालेल्या पाचही प्रस्तावांवर चर्चा झाली.

अधिवेशनादरम्यान सात अध्यादेश सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. शासकीय २२ विधेयके पुरः स्थापित करण्यात आली. त्यापैकी २१ विधेयके विधानसभेने संमत केली, तर एक विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले. विधान परिषदेने नऊ विधेयके संमत केली. अशासकीय २९ विधेयकांच्या सूचनांपैकी ११ मान्य करण्यात आल्या. त्यापैकी १२ विधेयके पुरःस्थापित आणि आठ विचारात घेण्यात आली.

सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवरील ३२४ सूचनांपैकी १३६ मान्य करण्यात आल्या आणि १० चर्चा पार पडल्या. अर्धा तास चर्चेच्या १४ सूचनांवर चर्चा झाली. अंतिम आठवडा प्रस्तावावरही सविस्तर चर्चा झाली.

अधिवेशनात सदस्यांची सरासरी उपस्थिती ७५.२६ टक्के राहिली. सर्वाधिक उपस्थिती ८४.९६ टक्के नोंदविण्यात आली.

या अधिवेशनातील विशेष बाब म्हणजे ९ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजता सुरू झालेली सभागृहाची बैठक १० जुलै रोजी पहाटे ३.३९ वाजेपर्यंत चालली. एका दिवसात तब्बल १८ तास १० मिनिटे कामकाज झाले असून अनेक वर्षांनंतर इतक्या प्रदीर्घ



कालावधीपर्यंत सभागृहाचे कामकाज चालले आणि विविध विषयांवर सखोल चर्चा झाली.

**पावसाळी अधिवेशन २०२६ विधानपरिषदेत १०१ तास १० मिनिटे कामकाज...**

विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन आज राष्ट्रगीताने संस्थगित करण्यात आले. पुढील अधिवेशन ७ डिसेंबर २०२६ रोजी नागपूर येथे होणार आल्याची घोषणा विधानपरिषदेत सभापती प्रा. राम शिंदे यांनी केली.

विधानपरिषदेत १०१ तास १० मिनिटे कामकाज झाले. रोजचे सरासरी कामकाज ७ तास १३ मिनिटे झाले. या अधिवेशनात सभागृहात सदस्यांची जास्तीत जास्त उपस्थिती ९०.१४ टक्के होती, तर एकूण सरासरी उपस्थिती ही ७८.५७ टक्के इतकी होती.

विधानपरिषदेत ९ विधेयके पूर:स्थापित करण्यात आली आणि ती संमत करण्यात आली. विधानसभेने पारित केलेली १८ विधेयके विधानपरिषदेत संमत करण्यात आली. तर ३ विधेयके शिफारशींशिवाय विधानसभेकडे परत पाठविण्यात आली. सभागृहात नियम ९७ अन्वये एकूण ४९ प्राप्त सूचना, तर ४८ सूचना मान्य करण्यात येऊन त्यावर चर्चा झाली. अधिवेशनात सहकार्य केल्याबद्दल सभापती राम शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

## चंद्रपुरात भीषण अपघात !

### ताडोबा रोडवर भरधाव बसने सायकलस्वाराला चिरडले

**अक्षराज : वसंत वडस्कर**




**दि.११, चंद्रपूर :** चंद्रपूर शहरातील रामनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील ताडोबा रोडवर आज सकाळी एका भरधाव बसने सायकलस्वाराला चिरडल्याची अत्यंत दुर्दैवी आणि भीषण दुर्घटना घडली आहे. या अपघातात सायकलस्वाराचा जागीच वेदनादायक मृत्यू झाला असून, सकाळी- सकाळीच घडलेल्या या घटनेमुळे तुकुम आणि ताडोबा रोड परिसरात एकच खळबळ उडाली आहे. विनायक गंगाधर पराते (वय ५३ वर्षे, रा. तुकुम) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तुकुम परिसरातील पोलीस हॉल समोर आज, ११ जुलै रोजी सकाळी हा अपघात झाला. विनायक गंगाधर पराते हे आपल्या सायकलने नेहमीप्रमाणे जात असताना, अचानक आलेल्या एमएच ४० एन ९४२९ या क्रमांकाच्या बसने त्यांच्या सायकल ला जोरदार धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, विनायक पराते हे थेट बसच्या चाकाखाली आले. चाकाखाली चिरडले गेल्याने त्यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच रामनगर पोलीस स्टेशनचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवत मृतदेह ताब्यात घेतला असून तो उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात रवाना केला आहे. सध्या रामनगर पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, ताडोबा रोड हा मार्ग अत्यंत वर्दळीचा असून या ठिकाणी दिवस-रात्र वाहनांची मोठी रेलचेल असते. त्यातच रस्त्यावरील वाढते अतिक्रमण अपघातांना कारणीभूत ठरत असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे. काही वर्षांपूर्वी याच मार्गावर पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या एका तरुण मुलीचा अशाच भीषण अपघातात मृत्यू झाला होता. त्या घटनेनंतर जनक्षोभ उसळल्याने महानगरपालिका आणि पोलीस विभागाने संयुक्त मोहीम राबवून या मार्गावरील अतिक्रमण काढून रस्ता मोकळा केला होता. मात्र, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे काही दिवसातच या मार्गावरील स्थिती पुन्हा 'जैसे थी' झाली. याच वाढत्या अतिक्रमणामुळे आज विनायक पराते यांना आपले प्राण गमवावे लागल्याने स्थानिक नागरिकांकडून तीव्र संताप आणि हळहळ व्यक्त केली जात आहे.

## नगर-मनमाड महामार्गावर पुन्हा धुळीचे साम्राज्य; खड्ड्यांमुळे वाहनचालक त्रस्त

**अक्षराज : प्रमोद डफळ**



**दि.११, राहुरी :** राहुरी शहर आणि राहुरी खुर्द परिसरातून जाणाऱ्या नगर-मनमाड महाम ार्गाची अवस्था पुन्हा एकदा दयनीय बनली आहे. महामार्गाच्या नूतनीकरणाचे काम पूर्ण होण्यापूर्वीच अनेक ठिकाणी रस्ता उखडून खड्डे पडले असून, पावसामुळे साचणाऱ्या पाण्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली आहे. परिणामी वाहनचालकांसह व्यापाऱ्यांनाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, रस्त्यावरील डांबरीकरण अनेक ठिकाणी वाहून गेले असून खडी उघडी पडली आहे. पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचत असल्याने वाहन चालविताना चालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना अपघाताचा धोका वाढला असून, चारचाकी वाहनांनाही सावधगिरीने मार्गक्रमण करावे लागत आहे. महामार्गावरून मोठ्या प्रमाणात अवजड वाहतूक होत असल्याने धुळीचे लोट सतत उडत आहेत. मोठ्या वाहनांच्या मागून उडणाऱ्या धुळीमुळे मागील वाहनचालकांना पुढील रस्ता स्पष्ट दिसत नाही. त्यामुळे वाहतुकीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, अपघाताची शक्यता वाढल्याची भावना वाहनचालक व्यक्त करत आहेत. दरम्यान, राहुरी शहर व राहुरी खुर्द येथील व्यापारीही धुळीमुळे त्रस्त झाले आहेत. दुकानांमध्ये सतत धूळ साचत असल्याने ग्राहक आणि व्यावसायिक दोघांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. नागरिकांनी संबंधित विभागाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करून खड्डे बुजवावेत, धूळ नियंत्रणासाठी उपाययोजना कराव्यात आणि नूतनीकरणाचे काम दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावे, अशी मागणी केली आहे. महामार्गाची सद्यस्थिती पाहता, संबंधित यंत्रणांनी तातडीने लक्ष घालून वाहनचालक व नागरिकांना दिलासा देण्याची आवश्यकता असल्याचे मत परिसरातून व्यक्त होत आहे.

## बोरीत चार दुकानांवर चोरट्यांचा डल्ला

**अक्षराज : जफर शेख**

**दि.११, बोरी :** बोरी (ता.जिंतूर) येथे महामार्गालगत असलेल्या चार दुकानांमध्ये मध्यरात्री अडीच वाजण्याच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी चोरी केल्याची घटना घडली. परिसरातील स्ट्रीट लाईट बंद असल्याने चोरट्यांनी अंधाराचा फायदा घेत ही चोरी केल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. चोरट्यांनी घोलप किराणा, महादेव सोनटक्के किराणा, भाग्यवंत किराणा तसेच एका कृषी केंद्राला लक्ष्य केले. दुकानांच्या गल्ल्यातील रोख रक्कम व काही ड्रायफ्रूट्स असा अंदाजे ३५ते ४०हजार रुपयांचा ऐवज चोरून नेण्यात आला. ज्या ठिकाणी चोरी झाली, त्या ठिकाणच्या व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे की, चोरीच्या वेळीच गावातील सर्व लाईट अचानक बंद झाल्या होत्या. तसेच महामार्ग परिसरात त्या वेळेत पोलिसांची गस्त (पेट्रोलिंग) देखील झाली नसल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे चोरट्यांना चोरी करण्यास संधी मिळाल्याची भावना व्यापारी वर्गातून व्यक्त होत आहे. चोरीच्या घटनेनंतर व्यापाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून महामार्ग परिसरातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही दुकानांजवळील सीसीटीव्ही फुटेजमध्ये संशयित चोरट्यांच्या हालचाली कैद झाल्याची माहिती मिळाली आहे. दरम्यान, महामार्गावरील बंद असलेल्या स्ट्रीट लाईट तातडीने सुरू करण्यात याव्यात तसेच रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवण्यात यावी, अशी मागणी व्यापारी व नागरिकांकडून करण्यात येत आहे. घटनेची माहिती मिळताच बोरी पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपास सुरू केला आहे.अंगठ्याचे ठसेतज्ञ, श्वान पथक या ठिकाणी दाखल झाले होते CCTV फूटेज चा आधारे पोलिसांचा तपास सुरु आहे असे बोरी पोलीस स्टेशन चे स.पो. उपनिरीक्षक महादेव गायकवाड यांनी सांगितले.

अक्षराज






## अवैध वाळू उपशाचा प्रश्न

मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत गोदावरी, मंजरा, तेरणा, पूर्णा, कयाधू, दुधना आणि त्यांच्या उपनद्या वाहतात. या नद्यांवर सरकारी मंजुरी मिळालेले २००च्या आसपास वाळू घाट होते. गेल्या काही वर्षांत सुरू असलेल्या बेसुमार वाळू उपशाने या नद्यांचे अस्तित्व धोक्यात येण्याची भीती उद्धवली आहे.

छत्रपती संभाजीनगर १०, जालना ३५, परभणी ४८, बीड १४, धाराशिव १०, लातूर-हिंगोली २७ आणि नांदेड ४७ अशा एकूण १९१ वाळू घाटांचे लिलाव झाले होते. ९ जून रोजी नियमानुसार अधिकृतरीत्या वाळूउपसा बंद झाला. तरी वाळू वाहतूक करणारी वाहने पकडल्याच्या बातम्या सुरूच आहेत. काही वर्षांपूर्वी जाहीर केलेल्या धोरणानुसार नदीपात्रातील वाळू उत्खनन करून त्याचा डेपो जवळ घातला जात होता. ग्राहकाला ६०० रुपये ब्रासप्रमाणे वाळू देण्याचे धोरण लागू केले गेले होते. त्यात वाहतुकीचा खर्च वाढला आणि त्याचा आर्थिक फटका सरकारला बसू लागला. त्यामुळे हे धोरण पुन्हा बदलले गेले. 'वाळू रेती निर्गती धोरण -२०२५' लागू केले. भौगोलिक परिस्थितीनुसार वाळू घाटांचे ई-लिलाव केले जातात. अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी विशेष भरारी पथके तैनात केली जातात. नवीन कायद्यानुसार जप्तीची कठोर कारवाईही केली जाते. असे असूनही अवैध वाळू उपसा, चोरीचे सत्र थांबलेले दिसत नाही.

सरकारच्या विविध योजनांतून मंजूर घरकुल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू उपलब्ध करून देण्याचे शासन धोरण आहे. याचा गैरफायदा घेत बीड जिल्ह्यात मोठा वाळू गैरव्यवहार झाला. श्री क्षेत्र राक्षसभुवन शनीचे (ता. गेवराई, जि. बीड) येथून घरकुल लाभार्थ्यांच्या नावावर सरकारी अधिकारी, कर्मचारी व अवैधपणे वाळू व्यवसाय करणाऱ्यांनी संगनमत करून वाळू उपसा केला. सरकारची कोणतीही अधिकृत परवानगी किंवा घाट उत्खनन लिलाव झालेला नसताना हा उपसा झाला. ज्या लाभार्थ्यांच्या नावावर वाळू काढली गेली, त्यातील अनेकांना वाळू प्रत्यक्षात मिळालीच नसल्याचे चौकशीतून समोर आले. गेवराई पंचायत समितीसह बीड जिल्ह्यात अन्य पंचायत समित्यांकडून १६०० लाभार्थ्यांची यादी तहसीलदांना दिली गेली. त्यातून लाभार्थ्यांकडून ओटीपी घेऊन केवळ २३५ लाभार्थ्यांनाच वाळू दिली गेली. उर्वरित वाळू कुठे गेली हे वेगळे सांगण्याची गरज नाही. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना तक्रारी प्राप्त झाल्या. त्यांनी दहा पथके तयार करून अवैध वाळू उपशाची चौकशी केली. घटनास्थळाची मोजणी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने करण्यात आली. त्यात तब्बल २५ हजार ६४० ब्रास वाळू उपसा अनधिकृपणे केल्याचे निष्पन्न झाले.

प्रशासनाने तत्काळ महसूल विभागातील कोतवाल, ग्रामसेवक, पोलिस, तलाठी, मंडळ अधिकारी, तहसील कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी तसेच काही खासगी व्यक्ती अशा ५० जणांना 'कारणे दाखवा' नोटिसा बजावल्या. गुन्हे दाखल केले गेले. गेवराईच्या तहसीलदारांविरुद्ध सरकारकडे जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी अहवालही पाठवला. यात १०० कोटींचे सिंडिकेट कार्यान्वित असल्याचा गंभीर आरोप गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी केल्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य आणखी वाढले.

नदी व पर्यावरण संवर्धनासाठी कृत्रिम वाळूच्या वापराचे धोरण आले आहे. सरकारी कार्यालयांच्या बांधकामासाठी या वाळूचा वापर करण्याचा सरकारचा निर्णय झाला आहे. कृत्रिम वाळू तयार करणाऱ्या उद्योगांना सरकार प्रोत्साहनही देते. तरीही अवैध वाळू उपसा व चोरी सुरूच आहे. काही राज्यांत वाळूवरचे निर्बंध हटवले. बांधकाम परवानगी देताना किती ब्रास वाळू लागणार याचा अंदाज घेऊन, माहिती घेऊन परवाना दिला जातो. पर्यावरण सुरक्षित धोरण विचारात घेऊन राज्य सरकारने वाळूचा विषय मार्गी लावला पाहिजे. अन्यथा काही वर्षांत नद्या गायब झालेल्या दिसतील तेव्हा हाती काहीच राहणार नाही.

**- मकरंद कुलकर्णी**

# तुमच्या जगण्याचे ध्येय 'नवीन शिकणे' हे असावे!

जगण्याचे ध्येय काय असावे, हे माहीत नसलेले लोक सर्वाधिक आहेत. क्रांतिवीर या चित्रपटात नाना पाटेकर यांचा प्रसिद्ध संवाद आहे, क्यों आए, मालूम नहीं; क्यों जी रहे हैं, मालूम नहीं! हा संवाद अनेकांच्या ध्येयहीन जीवनाचे वास्तव अधोरेखित करतो.ध्येय नसलेले, चुकीच्या उद्दिष्टांचा पाठलाग करणारे किंवा सतत आपले ध्येय बदलणारे लोक यांनी आपल्या जगण्याचे एकच ध्येय निश्चित केले पाहिजेरोज काहीतरी नवीन शिकणे.

सुखी आणि आनंदी जीवन हीच अंतिम जीवनलक्ष्ये आहेत, हा एक प्रकारचा मृगजळ आहे. खरे ध्येय म्हणजे दररोज काहीतरी नवीन जाणून घेणे, आपल्या ज्ञानात भर घालणे आणि स्वतःला अधिक सक्षम व बुद्धिमान बनवत जाणे. असे केले, तर प्रत्येक दिवस आपल्याला जीवनाच्या अधिक उंच पातळीवर घेऊन जाईल.हिमालयातील उंच शिखरे सर करणारा गिर्यारोहक जसा एक-एक पाऊल टाकत शिखर गाठतो, त्याचप्रमाणे आपणही दररोज ज्ञानाची नवी शिखरे सर केली पाहिजेत.

शालेय शिक्षणाची सुरुवात इयत्ता पहिलीपासून होते. पुढे-पुढे अभ्यासाची कठीणता वाढत जाते आणि प्रत्येक विषय अधिक सखोल होत जातो. प्राथमिक शिक्षणाच्या भक्कम पायावर माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणाचा डोलारा उभा राहतो. परंतु त्यानंतरचे शिक्षण मात्र मोठ्या प्रमाणात




स्वतःच्या प्रयत्नांनी आणि स्वअभ्यासाच्या माध्यमातून घ्यावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही आयुष्यभर स्वअभ्यास आणि सातत्यपूर्ण ज्ञानार्जनाचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

थोडक्यात सांगायचे झाल्यास, पुढील आयुष्यात आपण मिळवत जाणारी माहिती, कौशल्ये, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, तत्त्वे, सिद्धांत आणि परिकल्पना यांमुळेच आपल्या विचारांत सुस्पष्टता येते आणि व्यक्तिमत्त्व अधिक परिपक्व बनते.याही पुढे जाऊन जो व्यक्ती नवीन ज्ञानाची निर्मिती करतो, विश्वातील वैज्ञानिक संकल्पनांचा शोध लावतो आणि त्या संकल्पनांच्या आधारे नवे तंत्रज्ञान विकसित करतो, त्याचे जीवन खऱ्या अर्थाने दीपस्तंभाप्रमाणे संपूर्ण मानवजातीचा मार्ग उजळवून टाकते.कारण नवनिर्मिती हीच जगातील सर्वोच्च कृती आहे. आपण निर्माण केलेल्या ज्ञानामुळे अनेकांना सुबुद्धी मिळाली, तर ते कार्य मानवी कल्याणाचे ठरते. आपण एखाद्या वैज्ञानिक संकल्पनेचा शोध लावला, तर तो पुढील पिढ्यांसाठी दिशादर्शक ठरतो. आणि त्या वैज्ञानिक संकल्पनेच्या आधारे उपयुक्त तंत्रज्ञान विकसित केले, तर ती मानवी जीवनातील एक क्रांती ठरते.

अशा तांत्रिक प्रगतीमुळे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, दळणवळण, संस्कृती आणि सामाजिक जीवनाशी संबंधित असंख्य गरजा पूर्ण होण्यास मदत होते. मानवी कष्ट, वेदना आणि दुःख कमी करण्याची अपार ताकद विज्ञान आणि तंत्रज्ञानात आहे.

म्हणूनच, प्रत्येक व्यक्तीने आपले ध्येय केवळ गाडी, बंगला, शेतीवाडी किंवा इतर भौतिक संपत्ती मिळविण्यापुरते मर्यादित ठेवू नये. आपल्या ध्येयाचे क्षितिज वैयक्तिक यशापासून मानवी कल्याणापर्यंत विस्तारले पाहिजे. त्या प्रवासातील पहिली आणि सर्वांत महत्त्वाची पायरी म्हणजे रोज काहीतरी नवीन शिकत राहणे होय.

**– किशोर जाधव, सोलापूर**
**– मो. नं. ९९२२८८२५४१**

# घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक

रविवार विशेष..
कव्हर स्टोरी!

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे कारण आयष्यभर सोडाच पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो. आज देशातील न्यायालयात घटस्फोटाचे लाखो याचिका प्रलंबित आहेत. दररोज त्यात भर पडतेच, घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे.



घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे. वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात होते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते आज मात्र अगदी किरकोळ कारणांवरून देखील घटस्फोट मागितला जातो. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो. पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. घटस्फोटाची ही किरकोळ कारणे जितकी हास्यास्पद वाटतात तितकीच ती चिंताजनक देखील आहेत कारण अशा किरकोळ कारणांनी जर घटस्फोट होऊ लागला तर विवाह संस्थाच धोक्यात येईल. याशिवाय पती मारहाण करतो, अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते. अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे. नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते. माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्वास. जर विश्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नी मध्ये विश्वास खूप महत्वाचा आहे विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पतीपत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारामुळेच नाती तुटतात म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## सवाई वारी

बदले स्वरुप काही
वारी हायफाय होई
जणूंइव्हेंटमॅनेजमेंट
ते वेगळेच रूप देई

केटरिंग कार धावते
सुसज्ज सा-यासोई
पक्वान्नी घम घमाट
तैनाती उत्तम रसोई

नेत्यांना कव्हर करा
मिडीयाचीचालू घाई
सेलिब्रिटी वारकरी
स्वागत हो ठाई ठाई

नेत्यांच्यामांदियाळी
झाकली ती विठाई
चोरटे घुसले गर्दीत
करूनघेतात कमाई

विरोधक सत्ताधारी
वारीमधे दिलजमाई
एकत्रचालले वारीत
जणू ते सासरेजमाई

जयघोष आसमंतात
जय विठ्ठल रूकमाई
स्वार्थ आपला पाही
रे नाव पांडुरंगाचे घेई

**हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात महिला कर्मचाऱ्यांसाठी "POSH' कार्यशाळा संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, चिमूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर आणि रिझ्युम संस्था, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (POSH) या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. मदनापूर येथील सभागृहात ही कार्यशाळा पार पडली. महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या कायदेशीर हक्कांची माहिती देऊन कामाच्या ठिकाणी अधिक सुरक्षित आणि निर्भय वातावरण तयार करणे, हा या कार्यशाळेचा उद्देश होता.




पळसगाव, शिवणी, कारवा आणि खडसंगी वन परिक्षेत्रातील सर्व महिला वनरक्षक, तसेच चिमूर एसटीपीएफच्या महिला वनरक्षक या कार्यशाळेत सहभागी झाल्या होत्या. प्रशिक्षक कु. कोमल वैद्य, ॲड. पल्लवी माटे आणि डॉ. प्राजक्ता धोटे यांनी उपस्थित महिला कर्मचाऱ्यांना कायद्यातील विविध कलमे आणि तरतुदींबाबत मार्गदर्शन केले.

उपजीविका अधिकारी प्रशांत वाहाणे व पळसगाव वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. बारसागडे यांनी कार्यशाळेच्या आयोजनासाठी परिश्रम घेतले.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात बातम्या

## झाडीपट्टीच्या संस्कृतीचा सुरेल आविष्कार; 'साजिरे गोजिरे तुझ्या पायात नुपूर गं' १२ जुलैला प्रेक्षकांच्या भेटीला

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, पोंभुर्णा (चंद्रपूर) :** झाडीपट्टीतील दर्जेदार मनोरंजन, संगीत आणि संस्कृतीला वाहिलेल्या Zadipatti Tarang या अधिकृत YouTube चॅनेलवर रविवार, दि. १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता 'साजिरे गोजिरे तुझ्या पायात नुपूर गं' हे झाडीपट्टी रोमँटिक प्रेमगीत प्रदर्शित होत आहे. झाडीपट्टीची संस्कृती, लोकसंगीत आणि स्थानिक कलाकारांची कला देशभर व जगभर पोहोचविण्याच्या उद्देशाने हा संगीतप्रकल्प साकारण्यात आला आहे. या गीताची निर्माती भाग्यश्री सचिन रायपुरे असून सहनिर्माते प्रफुल नागापुरे व अमोल तिगलवार आहेत. दिग्दर्शन वैभव पाल यांनी केले असून सचिन रायपुरे यांनी गीताला स्वर दिले आहेत. गीतलेखन गणेश चिताडे यांचे असून संगीत अक्षय मेश्राम यांनी दिले आहे. या प्रेमगीतात सचिन रायपुरे आणि प्रियंका भोंबे हे कलाकार प्रमुख भूमिकेत झळकणार आहेत. छायांकन (Director of Photography) राज सार्वे यांनी केले असून नृत्यदिग्दर्शन ललित रामटेके व मिथुन गणवीर यांनी केले आहे. विशेष सहकार्य अनिकेत गुरनुले, रुपाली ठाकरे, अखिल कुमरे आणि मयुर कुमरे यांचे लाभले आहे. संपादन लक्ष्मण माहुले व रणधीर निमजे यांनी केले आहे.

या गीताचे चित्रीकरण सावली तालुक्यातील सादागड, पोंभुर्णा तालुक्यातील देवाडा (बूज.) येथील नदी परिसर तसेच डोंगरहळदी येथील निसर्गरम्य डोंगर परिसरात करण्यात आले आहे. झाडीपट्टीच्या निसर्गरम्य वातावरणामुळे या गीताला आकर्षक दृश्यरूप प्राप्त झाले आहे.

Zadipatti Tarang या YouTube चॅनेलवर झाडीपट्टी मराठी गीते, रोमँटिक म्युझिक व्हिडिओ, डान्स व्हिडिओ, लोककला व सांस्कृतिक कार्यक्रम, नवोदित कलाकारांचे सादरीकरण तसेच मनोरंजनात्मक व्हिडिओ नियमितपणे प्रकाशित केले जातात. त्यामुळे सर्व रसिकांनी १२ जुलै २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता हे गीत पाहून चॅनेलला डीलीलअॅळलश करावे व इशश्रश्र खलेप दाबून नव्या व्हिडिओंचा आनंद घ्यावा, असे आवाहन निर्मिती संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिवसेना (उबाठा) युवासेना यांच्यावतीने मोफत हृदयरोग, व्हेरीकोज व्हेन्स तपासणी शिबिर



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.११, शहापूर (ठाणे) :** शिवसेना (उबाठा) व युवा सेना शहर शाखा शहापूर आणि अशोका मेडिकव्हर हॉस्पिटल्स यांच्या सहकार्याने सामाजिक उपक्रमांतर्गत नुकताच कुणबी भवन, शहापूर येथे रक्त तपासणी, व्हेरिकॉस वेन्स तपासणी, हृदयरोग व ई.सि.जि.तपासणी, थायरॉईड तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा ऊस्फुर्त प्रतिसाद लाभला. शेकडो अनेक रूग्णांची मोफत तपासणी करण्यात आली. तसेच शिबिरातील आलेल्या रूग्णा पैकी ज्या रूग्णांना शस्त्रक्रिया तसेच उपचाराची गरज आहे, त्यांची शासकीय योजनेतून मोफत शस्त्रक्रिया देखील करण्यात येणार आहे. यावेळी शिवसेनेचे काशीनाथ तिवरे व तालूका प्रमूख बाळा धानके राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष नंदकूमार मोगरे, रवींद्र लकडे, दत्ताशेठ ठाकरे, रश्मी ताई निमसे गूलाब ताई भेरे गणेश आवसरे यूवा सेना तालूकाप्रमूख आतूल भालके व महेश दिनकर, रविन्द्र खाडे, मधूकर वेखंडे तसेच सदर कार्यक्रम पार पाडण्यास विजय देशमूख शहरप्रमूख यूवासेना शहरप्रमूख हार्षद राऊत व सचिव बापू भोपतराव बाळा निमसे उपशहर प्रमुख यांनी विशेष मेहनत घेतली.

## पालममध्ये विशेष सखोल पुनरीक्षण कॅम्पची मुख्याधिकारी यांच्याकडून पाहणी



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.११, पालम (परभणी) :** केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (Special Intensive Revision - SIR) अभियानांतर्गत पालम शहरात बूथ लेव्हल अधिकारी (बीएलओ) यांच्या माध्यमातून विशेष कॅम्प आयोजित करण्यात आले आहेत. या कॅम्पमध्ये मतदारांची माहिती व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून मतदार यादी अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे. या अभियानांतर्गत आयोजित विशेष कॅम्पची पालम नगरपंचायतीचे मुख्याधिकारी युवराज पौळ यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी प्रशासकीय अधिकारी नितीन इजाते तसेच स्वच्छता निरीक्षक शेख शफी उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी कॅम्पमधील पडताळणी प्रक्रियेची माहिती घेत कामकाजाचा आढावा घेतला व संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या. यावेळी शहरातील सर्व पात्र मतदारांना या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन करण्यात आले. मतदार यादीतील नाव कायम राहण्यासाठी अथवा आवश्यक दुरुस्तीसाठी संबंधित बीएलओ कडे आवश्यक माहिती व कागदपत्रे वेळेत सादर करावीत, असे सांगण्यात आले. मतदार यादी अधिक अचूक, अद्ययावत व पारदर्शक करण्यासाठी सर्व नागरिकांनी प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## भालेराव हायस्कूल, सावनेर येथे गरजू विद्यार्थ्यांना नोटबुक वितरण



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** ब्रदर्स ऍन्ड सिस्टर असोसिएशन द्वारा संचलित मुक्ताई फाऊंडेशन तर्फे शनिवार, दिनांक ११ जुलै २०२६ गरजू विद्यार्थ्यांना नोटबुक वितरण करण्यात आले. लिखार परिवारातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उपक्रम राबविला गेला. कार्यकमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. स्व.भालेराव गुरुजींच्या पुतळ्याला हार अर्पण करून कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला प्रामुख्याने मुख्याध्यापिका भारती लोनकर, उपमुख्याध्यापक जाधव, फाऊंडेशनचे सदस्य चंद्रशेखर लिखार, प्रविण लिखार, आशा लिखार, प्रिती लिखार, कु.पुर्वा व अनिकेत आदीसह परिवारातील सदस्य उपस्थित होते. चंद्रशेखर लिखार यांनी भाषणात विद्यार्थ्यांनी खुप अभ्यास करून यशाची पायरी गाठावी, शिस्त जोपासून शाळेचे नाव उज्वल करावे, समाजोपयोगी कार्य करावे अशाप्रकारचे मार्गदर्शन केले.संचालन उज्वला बनकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सौ. केतकी शेंदरे, शिक्षिका सुषमा पर्वते, स्नेहल नागरे यांचे सहकार्य लाभले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाचा अजब कारभार! अर्ज करण्यापूर्वीच बारला मंजुरी

### राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह !



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** नियम आणि कायद्याचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाचा एक अजब चक्रावून टाकणारा कारभार खापरखेडा परिसरात समोर आला आहे. मे.पॉवर रेस्टॉरंट अँड बारला मंजुरी देताना बारच्या परवान्यासाठी अर्ज करण्याच्या पाच महिने आधीच उत्पादन शुल्क विभागाने त्याला मंजुरी बहाल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या संपूर्ण प्रकरणामागे मोठे अर्थकारण शिजल्याचा संशय व्यक्त होत असून राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

खापरखेडा मुख्य बाजारपेठेत राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या मंजूर नकाशानुसार एक वाईन शॉप सुरू आहे. याच वाईन शॉपच्या मागे एक हॉल उपलब्ध करून, त्या ठिकाणी आनंद पांडुरंग मोहाडीकर यांच्या नावावर मे.पॉवर रेस्टॉरंट अँड बार सुरू करण्यात आले आहे. थक्क करणारी बाब म्हणजे बारचे व्यवस्थापक मोहाडीकर यांनी मद्यविक्रीचा 'एफएल-३' परवाना मिळवण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडे २८ ऑगस्ट २०२५ रोजी अर्ज सादर केला. मात्र, जिल्हा समितीच्या बैठकीत या अर्जावर चक्क १० मार्च २०२५ रोजीच मंजुरीची मोहोर उमटवण्यात आली आहे. अर्ज करण्यापूर्वीच पाच महिने आधी मंजुरी कशी मिळाली? हा चमत्कार मोठ्या अर्थकारणामुळे झाला असल्याचा आरोप होतो आहे.

नियमानुसार कोणत्याही भागात एफएल-३ दारू दुकानाचा परवाना देण्यापूर्वी स्थानिक ग्रामपंचायतीचे 'ना हरकत प्रमाणपत्र' घेणे आणि नागरिकांच्या हरकती मागवणे बंधनकारक असते. मात्र, मे.पॉवर रेस्टॉरंट अँड बार सुरू करण्यापूर्वी चिचोली(खापरखेडा) ग्रामपंचायत प्रशासनाची कोणतीही परवानगी किंवा एनओसी घेण्यात आलेली नाही, शिवाय मंजूर नकाशात ज्या जागेवर वाईन शॉप दाखवले आहे त्याच जागेवर नियमांचे उल्लंघन करून हा बार थाटण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली असून एफएल-३ ची परवानगी घेण्यापूर्वी आवश्यक असलेले किराया पत्र देखील उत्पादन शुल्क विभागाकडे सादर करण्यात आले नसल्याची माहिती समोर येत आहे.

खापरखेडा परिसरात आधीच एका डझनापेक्षा जास्त बिअर बार, चार-पाच देशी दारूची दुकाने आणि एक वाईन शॉप थाटलेले आहे. त्यात आता नियमबाह्य पद्धतीने आणखी एका नव्या बिअर बारची भर पडल्याने स्थानिक नागरिकांमध्ये, विशेषतः महिलांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. सर्व नियम धाब्यावर बसवून स्थानिक ग्रामपंचायतीला डावलून व अर्जाच्या तारखेचा घोळ घालून देण्यात आलेला हा परवाना संशयाच्या भोवऱ्यात सापडला आहे. सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी व 'मे. पॉवर रेस्टॉरंट अँड बार'ला दिलेला एफएल-३ चा परवाना तातडीने रद्द करण्यात यावा, अशी जोरदार मागणी आता परिसरातून होत आहे. यासंदर्भात राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक वैभव वैद्य यांच्याशी संपर्क केला असता अधीक्षक रामोड यांच्याशी संपर्क करण्याचे सांगून हात वर केले.

# अखंडित वीज पुरवठ्यासाठी अहोरात्र झटणारा निःशब्द हिरो : वायरमन सागर शिंदे

**अक्षराज : रघुनाथ थोरात**

**दि.११, उंब्रज :** आजच्या युगात वीज ही केवळ सुविधा नसून प्रत्येकाच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. घरातील दिवा लागण्यापासून शेतातील पंप सुरू होण्यापर्यंत, रुग्णालयातील जीवनरक्षक यंत्रांपासून उद्योगधंद्यांच्या उत्पादनापर्यंत प्रत्येक गोष्ट विजेवर अवलंबून आहे. मात्र हा उजेड अखंडित ठेवण्यासाठी पडद्यामागे अनेक हात झटत असतात. त्यापैकीच एक नाव म्हणजे वायरमन सागर गणेश शिंदे.

कर्तव्यनिष्ठा,धाडस,सेवाभाव आणि जबाबदारी यांचा सुंदर संगम असलेले सागर शिंदे हे नागरिकांच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत असलेले एक समर्पित वायरमन म्हणून ओळखले जातात. वीजपुरवठा खंडित झाला की बहुतांश लोक तक्रार करतात; परंतु त्या तक्रारीचे निराकरण करण्यासाठी जीव धोक्यात घालून ट्रान्सफॉर्मरवर चढणारा, विद्युत वाहिन्यांवर काम करणारा आणि प्रत्येक घरात पुन्हा उजेड पोहोचवणारा माणूस म्हणजे सागर शिंदे.

कडक उन्हाचा तडाखा असो, मुसळधार पाऊस असो, वादळी वारे असोत किंवा मध्यरात्रीची वेळ असो... नागरिकांना अंधारात ठेवण्यापेक्षा वीजपुरवठा सुरळीत करण्याला ते नेहमीच प्राधान्य देतात. सुट्टी, सण किंवा वैयक्तिक काम यांचा विचार न करता जनतेची सेवा प्रथम या भावनेने ते काम करत असल्याचे त्यांच्या कार्यातून दिसून येते.

छायाचित्रात उच्चदाबाच्या रोहित्रावर उभे राहून काम करणारे सागर शिंदे हे केवळ एक कर्मचारी नसून कर्तव्याशी प्रामाणिक राहणाऱ्या कर्मयोग्याचे प्रतीक वाटतात. अशा प्रकारचे काम अत्यंत जोखमीचे असते. प्रत्येक हालचाल सावधपणे करावी लागते. क्षणभराची चूकही जीवावर बेतू शकते. तरीही आपल्या कामाबद्दल असलेली निष्ठा आणि आत्मविश्वास यांच्या बळावर ते हे आव्हान रोज स्वीकारतात.



शेतकऱ्यांच्या शिवारातील पाण्याच्या मोटारी सुरू रहाव्यात, विद्यार्थ्यांचा अभ्यास अंधारामुळे थांबू नये, लघुउद्योगांचे काम बंद पडू नये आणि नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊ नये, यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. वीजपुरवठा खंडित झाल्याची माहिती मिळताच शक्य तितक्या कमी वेळेत घटनास्थळी पोहोचून बिघाड दूर करण्यासाठी त्यांची धडपड सुरू होते.अनेक वेळा वीज कर्मचारी काम करत असताना त्यांना केवळ टीकाच सहन करावी लागते. काम व्यवस्थित झाले तर ते कर्तव्य समजले जाते; पण बिघाड झाल्यास सर्वप्रथम रोष त्यांच्यावरच व्यक्त होतो. अशा परिस्थितीतही संयम न सोडता नागरिकांशी सौजन्याने वागणे आणि प्रामाणिकपणे सेवा देणे, हीच सागर शिंदे यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ताकद आहे. समाजात डॉक्टर, पोलीस, अग्निशमन दल आणि इतर आपत्कालीन सेवांप्रमाणेच वीज कर्मचाऱ्यांचे योगदानही तितकेच महत्त्वाचे आहे. मात्र त्यांच्या कार्याचा गौरव फारसा होत नाही. त्यामुळे समाजासाठी निःस्वार्थपणे काम करणाऱ्या अशा कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेणे ही समाजाची नैतिक जबाबदारी आहे. वायरमन सागर शिंदे यांनी आपल्या प्रामाणिक सेवेतून कर्तव्य म्हणजे केवळ नोकरी नसून समाजाप्रती असलेली बांधिलकी आहे, हे दाखवून दिले आहे. त्यांच्या सेवाभावी वृत्तीला, धाडसाला आणि कर्तव्यपरायणतेला मनापासून सलाम.

# छत्रपती संभाजी महाराज स्मारकासाठी ३५० कोटींचा आराखडा - मंत्री उदय सामंत

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, मुंबई :** रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर कसबा येथे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक उभारण्यास राज्य सरकार कटिबद्ध असून, या स्मारकासाठी ३५० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार अधिक जमीनही संपादित करण्यात येईल अशी माहिती मंत्री डॉ.उदय सामंत यांनी विधानपरिषदेत दिली.

याबाबत सदस्य प्रमोद जठार यांनी लक्षवेधी सूचना मांडली. यावेळी चर्चेत सदस्य प्रविण दरेकर यांनी सहभाग घेतला.



मंत्री उदय सामंत म्हणाले, रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर कसबा या ठिकाणी स्मारकासाठी अधिक जमीन उपलब्ध झाल्यास सरकार त्याचाही सकारात्मक विचार करेल. स्मारकाच्या दुसऱ्या टप्प्यात परिसरातील डोंगराळ भाग आणि इतर आवश्यक जागा संपादित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात येणार येईल.

राज्यमंत्री योगेश कदम याबाबत अधिक माहिती देताना म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय भाषणात या स्मारकाची घोषणा केली असून, सुमारे ३५० कोटी रुपयांचा सविस्तर आराखडा तयार करण्यात आला आहे. मूळ वाड्याच्या परिसरात स्मारक उभारण्यास प्राधान्य देण्यात येणार असून, परिसरातील अतिरिक्त जमीन उपलब्ध झाल्यास ती सुद्धा संपादित करून स्मारकाचा विस्तार करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

# आषाढी यात्रेसाठी एसटीची मोठी तयारी ! पंढरपूरात 'राजमाता जिजाऊ' च्या ५ नव्या बस दाखल

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.११, पंढरपूर :** आषाढी एकादशी यात्रेच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या कानाकोपऱ्यातून पंढरपूरकडे येणाऱ्या लाखो वारकरी आणि भाविकांच्या प्रवासाची वाढती गरज लक्षात घेऊन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. पंढरपूर आगाराच्या ताफ्यात 'राजमाता जिजाऊ' मालिकेच्या पाच अत्याधुनिक नवीन बसांचा समावेश करण्यात आला असून, या बसचे लोकार्पण पंढरपूर–मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

आषाढी यात्रेदरम्यान पंढरपूरमध्ये लाखो भाविक दाखल होत असल्याने एसटी महामंडळावर सुरक्षित, वेळेवर आणि दर्जेदार सार्वजनिक वाहतूक सेवा पुरविण्याची मोठी जबाबदारी असते. याच पार्श्वभूमीवर नव्या बसांचा ताफा उपलब्ध झाल्याने यात्रेतील अतिरिक्त प्रवासीभार हाताळण्यास मोठी मदत होणार असून, प्रवाशांना अधिक आरामदायी, सुरक्षित आणि जलद सेवा मिळणार आहे.

लोकार्पणानंतर आमदार समाधान आवताडे यांनी कार्यकर्त्यांसह नव्या बसमधून प्रत्यक्ष प्रवास करून बसच्या सुविधा आणि सेवांची पाहणी केली. यावेळी त्यांनी एसटी



अधिकाऱ्यांशी चर्चा करून यात्रेदरम्यान प्रवाशांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही, यासाठी आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना दिल्या.

याप्रसंगी पंढरपूर पंचायत समितीचे सभापती शुभम आगावणे, उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, आगार प्रमुख योगेश लिंगायत, विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, सांगोला स्थानक प्रमुख पंकज तोंडे, नगरसेवक संजय बंदपट्टे, माजी नगरसेवक किरणराज घाडगे, लखन चौगुले, विनोद लटके, द्रोणाचार्य हाके, विनोद सुरवसे, बशीर तांबोळी, आमीन शेख तसेच एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार समाधान आवताडे म्हणाले, आषाढी यात्रा ही महाराष्ट्राच्या श्रद्धा आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. दरवर्षी लाखो वारकरी विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये दाखल होतात. अशा वेळी त्यांना सुरक्षित, विश्वासार्ह आणि दर्जेदार वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे ही शासन आणि एसटी महामंडळाची प्राथमिक जबाबदारी आहे. नव्याने दाखल झालेल्या 'राजमाता जिजाऊ'च्या पाच बसांमुळे यात्रेच्या काळात प्रवाशांना अधिक चांगली सेवा मिळेल. तसेच पंढरपूर आगाराची वाहतूक क्षमता वाढून अतिरिक्त बसफेऱ्या प्रभावीपणे चालविणे शक्य होईल.

आषाढी यात्रेनिमित्त राज्यातील विविध जिल्ह्यांतून पंढरपूरकडे विशेष बससेवा सुरू करण्यात येत असून, नव्या बसांच्या समावेशामुळे या सेवेला अधिक बळ मिळणार आहे. यात्रेतील वाढती गर्दी, प्रवाशांची सुरक्षितता आणि वेळेवर सेवा देण्याच्या उद्देशाने एसटी महामंडळाने व्यापक नियोजन केले असून, नव्या बस या नियोजनाचा महत्त्वाचा भाग ठरणार आहेत. वारकऱ्यांच्या सेवेसाठी सज्ज झालेल्या या नव्या बसांमुळे केवळ यात्रेच्या काळातच नव्हे, तर त्यानंतरही पंढरपूर आगाराच्या नियमित वाहतूक सेवेत मोठी सुधारणा होणार आहे. त्यामुळे भाविकांसह स्थानिक नागरिकांनाही अधिक सक्षम, आधुनिक आणि विश्वासार्ह एसटी सेवेचा लाभ मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील जलजीवन मिशन रखडले; ३ वर्षांपासून 'सुधारित अंदाजपत्रक' हेच उत्तर - आ.तनपुरे

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.११, राहुरी (अहिल्यानगर) :** महाराष्ट्र विधानमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आमदार प्राजक्त तनपुरे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या रखडलेल्या कामांबाबत विधानपरिषदेत लक्षवेधी मांडत शासनाला धारेवर धरले. जिल्ह्यातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी वेळेत उपलब्ध करून देण्यासाठी रखडलेल्या योजनांना तातडीने मंजुरी देण्याची मागणी त्यांनी केली.



विधानपरिषदेत बोलताना तनपुरे म्हणाले की, गेल्या तीन वर्षांपासून शासनाकडून एकच उत्तर दिले जात आहे की, 'योजनेचे सुधारित अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे.' मात्र प्रत्यक्षात अनेक योजना अद्याप अपूर्ण अवस्थेत आहेत. यावेळी त्यांनी शासनाला काही महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. सुधारित अंदाजपत्रके नेमकी कधी पूर्ण होणार आणि रखडलेला निधी नागरिकांना कधी मिळणार? असा प्रश्न त्यांनी विचारला. तसेच फेरसर्वेक्षणाची वेळ का आली, मूळ सर्वेक्षणात अनेक वाड्या-वस्त्या का वगळल्या गेल्या आणि त्यामुळे भविष्यात पाणीपुरवठा यंत्रणा अपुरी पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे का, याबाबतही त्यांनी स्पष्टीकरण मागितले. चुकीचे सर्वेक्षण करणाऱ्या संबंधित एजन्सींवर कारवाई होणार का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. तनपुरे यांनी सांगितले की, जिल्ह्यातील जवळपास सर्वच जलजीवन मिशनच्या योजना अर्धवट अवस्थेत आहेत.

नव्याने सुटलेल्या भागांचा समावेश करण्यासाठी पुन्हा सुधारित अंदाजपत्रके तयार करण्याची वेळ आली असून, यामुळे कामांना विलंब होत आहे. यावर उत्तर देताना संबंधित मंत्री महोदयांनी सांगितले की, राज्यभरातून सुमारे १८ हजार सुधारित प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ११ हजार प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे. सुटलेल्या वाड्या-वस्त्यांचा समावेश या प्रस्तावांमध्ये करण्यात आला आहे.

अहिल्यानगरसह राज्यातील उर्वरित सुधारित प्रस्तावांना शक्य तितक्या लवकर मान्यता देऊन निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच ही योजना डिसेंबर २०२८ पर्यंतच्या वाढीव लोकसंख्येचा विचार करून तयार करण्यात आली असून, ज्या ठिकाणी साठवण टाक्या अपुऱ्या आहेत तेथे अतिरिक्त टाक्यांचाही समावेश केला जाईल, अशी माहिती मंत्र्यांनी सभागृहात दिली.

समारोपात आ. प्राजक्त तनपुरे यांनी अहिल्यानगर जिल्ह्यातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळणे हा त्यांचा मूलभूत हक्क असून, योजनेतील दिरंगाई तातडीने थांबवावी, सुधारित प्रस्तावांना मंजुरी देऊन निधी वर्ग करावा आणि चुकीचे सर्वेक्षण करणाऱ्या एजन्सींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी शासनाकडे केली.

# केईएम, नायर, कूपर आणि सायन हॉस्पिटलमध्ये एमआरआय सुविधा मिळणार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, मुंबई :** किंग एडवर्ड मेमोरियल (केईएम) रुग्णालय, डॉ. बी.वाय.एल. नायर धर्मादाय रुग्णालय, डॉ. आर.एन. कूपर महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय आणि लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय (सायन) या चारही प्रमुख महानगरपालिका रुग्णालयांमध्ये नवीन एमआरआय मशीन खरेदीची प्रक्रिया तसेच प्राथमिक उभारणी पूर्ण झाली असून ऑक्टोबर २०२६ पर्यंत ही एमआरआय यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधानसभेत दिली. महानगरपालिका रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅन व एमआरआय यंत्रणांबाबत सदस्य अबू आझमी यांनी लक्षवेधी सूचना मांडली




होती. त्यास उत्तर देताना राज्यमंत्री मिसाळ बोलत होत्या.

राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या की, बृहन्मुंबई महानगरपालिके अंतर्गत ४ प्रमुख, १६ उपनगरीय आणि ५ स्पेशालिटी रुग्णालये कार्यरत आहेत. त्यापैकी ४ प्रमुख व ३ उपनगरीय रुग्णालयांमध्ये एमआरआय, तर ४ प्रमुख व ५ उपनगरीय रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅन सुविधा उपलब्ध असून सर्व सीटी स्कॅन यंत्रणा कार्यरत आहेत डॉ. बी.वाय.एल. नायर धर्मादाय रुग्णालयातील एमआरआय मशीन बंद असल्याने रुग्णांना छोटा सायन येथील महानगरपालिका मान्यताप्राप्त सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) एमआरआय केंद्रात महानगरपालिकेच्या निर्धारित दराने सेवा उपलब्ध करून दिली जात आहे.

किंग एडवर्ड मेमोरियल (केईएम) रुग्णालयात दररोज सुमारे ६,००० बाह्यरुग्ण उपचारासाठी येतात, तर १,९५० आंतररुग्णांसाठी खाटांची सुविधा उपलब्ध आहे. रुग्णालयातील दोन सीटी स्कॅन मशीन पूर्ण क्षमतेने कार्यरत असून दररोज ११० ते १२० सीटी स्कॅन केले जातात.

आपत्कालीन रुग्णांचे सीटी स्कॅन त्याच दिवशी, तर आंतररुग्णांचे १ ते २ दिवसांत केले जातात. बाह्य रुग्णांसाठी सुमारे एक महिन्याची प्रतीक्षा आहे. केईएममध्ये एक एमआरआय मशीन कार्यरत असून त्याद्वारे दररोज २५ ते ३० एमआरआय केले जातात. गंभीर रुग्णांना तातडीने, तर आंतररुग्णांना १ ते २ दिवसांत एमआरआयची सुविधा दिली जाते. बाह्यरुग्णांना महानगरपालिकेच्या इतर रुग्णालयांमध्ये तसेच चार मान्यताप्राप्त केंद्रांवर महानगरपालिकेच्या दराने एमआरआयची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. तसेच, केईएम रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात केसपेपर वितरणासाठी एकूण १९ संगणकीकृत (एचएमआयएस) खिडक्या उपलब्ध असून आपत्कालीन रुग्णांसाठी २४ तास स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे.

# दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण, करिअर, व्यक्तिमत्त्व विकास व जीवन कौशल्यांचे तज्ज्ञांकडून मार्गदर्शन

**अक्षराज : रहीम कोक्कर**

**दि.११, जिंतूर (परभणी) :** जिंतूर शहरातील अली मियाँ एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला 'पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट प्रोग्राम' मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाला. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना केवळ परीक्षेत यश मिळविणेच नव्हे, तर जीवनात आत्मविश्वासाने पुढे जाणे, योग्य करिअरची निवड करणे, वेळेचे नियोजन, संवाद कौशल्य आणि व्यक्तिमत्त्व विकास यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर तज्ज्ञांनी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात उपस्थित राहण्याचा तसेच मान्यवरांच्या हस्ते सत्कार स्वीकारण्याचा सन्मान लाभला. या सन्मानाबद्दल आयोजकांसह सर्व मान्यवरांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाचे आयोजन मौलाना सिराज अहमद यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मोहतरम सईद अहमद (मोटिवेशनल स्पीकर, ट्रेनर अँड कोच, पुणे) यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, सकारात्मक विचार, यशस्वी करिअर आणि आयुष्यातील ध्येय निश्चित करण्याबाबत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच काझी आसेफोद्दीन सिद्दीकी यांनीही विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व आणि नैतिक मूल्यांवर मार्गदर्शन केले. यावेळी मौलाना अब्दुल जलील, काझी आसेफुद्दीन सिद्दीकी, मौलाना सिराज अहमद, काझी वासिफुद्दीन सिद्दीकी, गाजी गुलाम मोहम्मद (मिट्टूभाई), नगरसेवक शेख अथर, डॉ. जुनैद खान, डॉ. इरफान आगाई पटेल यांच्यासह



अनेक धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत मार्गदर्शनाचा लाभ घेतला. उपस्थित मान्यवरांनी अशा प्रकारचे उपक्रम ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. समाजातील विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत व्यक्तिमत्त्व विकासालाही तितकेच महत्त्व दिल्यास ते स्पर्धेच्या युगात निश्चित यशस्वी होतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या प्रसंगी बोलताना, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अशा प्रेरणादायी आणि मार्गदर्शक उपक्रमांना माझा नेहमीच पाठिंबा राहील. शिक्षणासोबत व्यक्तिमत्त्व विकास ही आजच्या काळाची गरज असून अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांना नवी दिशा आणि आत्मविश्वास मिळतो, असे मत व्यक्त करण्यात आले.

# विंचूरकरांची विशेष सखोल पुनरीक्षण (SIR-2026) मोहिमेकडे पाठ; मतदार नोंदणीला मिळेना प्रतिसाद

## BLO घरोघरी फिरत नाही; नागरिक उदासीन; भविष्यात मतदानाचा हक्क हुकण्याची भीती

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.११, विंचूर (नाशिक) :** भारतीय निवडणूक आयोगाच्या वतीने सध्या राबविण्यात येत असलेल्या 'विशेष सखोल पुनरीक्षण' (Special Intensive Revision - SIR-2026) कार्यक्रमाला विंचूर परिसरात अत्यंत थंड प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. मतदार यादी अद्ययावत करणे, नवीन मतदारांची नावनोंदणी, चुकांची दुरुस्ती आणि मृत किंवा स्थलांतरित मतदारांची नावे वगळण्याची अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया सुरू असली, तरी अनेक नागरिकांनी या मोहिमेकडे पुरते दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे. सध्या बूथ स्तरीय अधिकारी (इङज) नागरिकांच्या घरोघरी जाऊन माहिती संकलित करण्याचे काम करत आहेत. मात्र, या प्रक्रियेत अनेक अडचणी येत असल्याची माहिती समोर आली आहे.

**प्रशासकीय कामात येणारे मुरव्य अडथळे :-**

**नागरिकांची अनुपस्थिती :** बीएलओ (BLO) घरी जात नाही आणि अनेक कुटुंबातील नागरिक कामाच्या निमित्ताने बाहेर असल्याने घरी उपलब्ध होत नाहीत.

**कागदपत्रांची कमतरता :** आवश्यक असलेली वयाची आणि रहिवासी पुराव्याची कागदपत्रे नागरिक वेळेत उपलब्ध करून देत नाहीत.

**उदासीनता :** नंतर करू किंवा निवडणुकीच्या वेळी पाहू अशा मानसिकतेमुळे अनेक जण या मोहिमेकडे गांभीर्याने पाहत नसल्याचे चित्र आहे.आता बुथ पध्दतीमुळे नागरिकांना आपण कोठे जायचे, कोणाला भेटायचे, आपले नांव कोणत्या यादीत आहे हे अशिक्षित लोकांना समजले जात नाही; त्यामुळे खुप मोठी अडचण होत आहे.

प्रशासनाचा इशारा आणि आवाहनमतदार यादीतील अचूकता राखण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. जर आता माहिती चुकीची किंवा अपूर्ण राहिली, तर भविष्यात मतदानाचा पवित्र हक्क बजावताना मोठ्या अडचणी निर्माण होऊ शकतात. नागरिकांनी कागदपत्रांसह सहकार्य करावे.– निवडणूक विभाग, स्थानिक प्रशासन

लोकशाही सक्षम करण्यासाठी सहकार्य गरजेचेलोकशाही अधिक सक्षम आणि मजबूत



करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत अचूक असणे ही काळाची गरज असल्याचे मत जाणकारांनी व्यक्त केले आहे. विंचूरच्या स्थानिक नागरिकांनी मतदार नोंदणी प्रक्रियेचे महत्त्व ओळखून वेळेत आपले अर्ज भरावेत, माहितीची पडताळणी करून घ्यावी आणि निवडणूक आयोगाच्या या राष्ट्रीय उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, अशी अपेक्षा आता व्यक्त होत आहे.

## थोडक्यात बातम्या

# माजी खा.पाटील यांच्या आश्वासनानंतर अवघ्या दोन दिवसांतच निफाड रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.११, पेण (रायगड) :** पेण तालुक्यातील जावळी – निफाड मार्ग ५ ते ७ जुलैदरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने परिसरातील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली होती. त्यामुळे निफाड गावातील नागरिक, शाळकरी विद्यार्थी, नोकरदार वर्गाला तसेच शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या पार्श्वभूमीवर माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी दिनांक ०८ जुलै रोजी पूरग्रस्त भागाची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना व ठेकेदाराला तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या सूचना दिल्या होत्या. पाऊस कमी होताच रस्ता मोटरेबल करण्याचे आश्वासन त्यांनी ग्रामस्थांना दिले होते.

या आश्वासनाची पूर्तता करत अवघ्या दोन दिवसांत, १० जुलै रोजी जावळी – निफाड रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली. त्यामुळे अनेक दिवसांपासून अडचणीत असलेल्या ग्रामस्थांना मोठा दिलासा मिळाला असून लवकरच वाहतूक पूर्ववत होणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी दिलेल्या आश्वासनानंतर अवघ्या दोन दिवसांतच कामाला सुरुवात झाल्याने जावळी व निफाड परिसरातील ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले. दिलेला शब्द पाळत तातडीने काम सुरू झाल्याबद्दल ग्रामस्थांनी माजी राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांच्या पाठपुराव्यामुळे ठेकेदाराने त्वरित कार्यवाही करून रस्त्याच्या दुरुस्तीला प्रारंभ केल्याने शाळकरी विद्यार्थी, नागरिक व शेतकऱ्यांची गैरसोय दूर होण्यास मोठा दिलासा मिळाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# पाणी उकळून व गाळून पिण्याचे नागरिकांना आवाहन

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.११, ठाणे :** सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने पिण्याच्या पाण्याद्वारे पसरणाऱ्या जलजन्य रोगांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. दक्षतेचा उपाय म्हणून नागरिकांनी पिण्याचे पाणी उकळून व गाळून प्यावे असे आवाहन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

पावसाळ्यात जलजन्य रोगांचा प्रसार होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने नागरिकांनी आपल्या इमारतींमधील जमिनीखालच्या तसेच इमारतीवरील पाण्याच्या टाक्यांची नियमित स्वच्छता करावी. तसेच पाण्याच्या टाक्यांच्या सभोवतालचा परिसर स्वच्छ ठेवावा, असेही आवाहन करण्यात आले आहे. आरोग्याच्या दृष्टीने खबरदारीचा उपाय म्हणून घरगुती वापरासाठी तसेच पिण्यासाठी वापरण्यात येणारे पाणी उकळून व गाळून घ्यावे. यामुळे जलजन्य रोगांचा प्रसार टाळता येईल असे आवाहन पाणीपुरवठा विभागामार्फत करण्यात आले आहे.

# 'व्हॉइस ऑफ मीडिया'च्या पालम तालुकाध्यक्षपदी गुणवंत सराफ; तर उपाध्यक्षपदी चांद तांबोळी



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, पालम (परभणी) :** पालम येथील हॉटेल शुक्लेश्वर येथे व्हॉइस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेची विशेष बैठक पार पडली या बैठकीमध्ये पालम तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली.बैठकीच्या प्रारंभी मराठी पत्रकारितेचे जनक आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर 'व्हॉइस ऑफ मीडिया'चे परभणी जिल्हाध्यक्ष कैलास चव्हाण आणि ग्रामीण जिल्हाध्यक्ष बालासाहेब काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली पालम तालुक्याची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष गुणवंत सराफ, उपाध्यक्ष चांद तांबोळी यांची नियुक्ती पत्र देऊन एकमताने निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारणी खालीलप्रमाणे असून यामध्येकार्याध्यक्ष सुनिल कवटकवार नाव्हेकार,सचिव बालासाहेब फुलपगार, कोषाध्यक्ष केरबाजी बहिरवाड, संघटक अंकुश वाघमारे, प्रसिद्धी प्रमुख प्रा.विनोद कांबळे, सल्लागार अंबादास ठाकूर कार्यवाहक गोविंद सोलेवाडतर सदस्य शेषराव सोपणे, रावसाहेब वावळे, गणेश काकडे , मार्गदर्शक रुक्माजी गिनगिने संग्राम खेडकर, लक्ष्मण दुधाटे, मोतीराम शिंदे.तालुक्यातील सर्व राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांकडून आणि पत्रकार बांधवांकडून अभिनंदन केले जात आहे.

# ०३ ऑगस्ट रोजी नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**दि.११, नवी मुंबई :** महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

माहे ऑगस्ट महिन्याचा लोकशाही दिन दि.०३ ऑगस्ट २०२६ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये दि.१७ जुलै २०२६ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे. लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळाच्या (Website) मुख्यपृष्ठावर जलद दुवे (Quick Links) आयकॉनवर उपलब्ध असून ती अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से.१५ ए, किल्ले गांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही छापील प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे. अर्ज करताना नागरिकांनी शासन निर्णयानुसार अर्जात नमूद तक्रार/निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दखल घ्यावयाची आहे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक- आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची विशेष नोंद घ्यावयाची आहे.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे.